Prerna Education Society,

**ShreePandharinath Art's & Commerce College,**
**Narkhed. Dist.-Nagpur**

# Department of Economics

## ANNUAL REPORT

**अर्थशास्त्र विभाग**

**(सत्र: 2020-21)**

कोरोना विषाणूच्या प्रादुर्भावामुळे महाविद्यालयाचे सत्र व वेळापत्रक यामध्ये मोठ्या प्रमाणात बदल करण्यात आला असल्यामुळे तसेच महाविद्यालय उशिरा सुरु करण्यात आली होती त्याचा परिणाम स्वरूप महाविद्यालयातील वर्ग मोठ्या प्रमाणात आभासी स्वरूपात घेण्यात आले. त्यामुळे महाविद्यालयातील कार्यक्रमावर त्याचा प्रभाव पडला. श्री पंढरीनाथ कला वाणिज्य महाविद्यालय अंतर्गत अर्थशास्त्र विभागाच्या वतीने दिनांक-18/02/21 ला अर्थशास्त्र विभागात अर्थशास्त्र अभ्यास मंडळाचे उद्घाटन व अर्थशास्त्र अभ्यास मंडळाची स्थापना करण्यात आली. कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जयंत जंवजाळ सर हे उपस्थित होते. सरांनी अर्थशास्त्र अभ्यास मंडळाचे उद्घाटन करून अर्थशास्त्राचे आर्थिक जीवनात महत्त्वाचे स्थान काय आहे? यावर मार्गदर्शन केले. विद्यार्थी जीवन जगत असताना विद्यार्थ्याला आर्थिक गोष्टीचे महत्त्व समजून घेणे सगळ्यात महत्त्वाचे असते. ज्याने आर्थिकतेचा अभ्यास केला तो जीवनात केव्हाच मागे येणार नाही असे त्यांनी समजून सांगितले. याचा विद्यार्थ्याला नक्कीच फायदा झालेला आहे.

त्यांनी कार्यक्रमांमध्ये मार्गदर्शन करीत असताना विद्यार्थ्यांनी जीवन जगत असताना आर्थिक साक्षरतेचे महत्व आणि आपल्या जीवनामध्ये आर्थिक साक्षरतेमुळे होणारे बदल याविषयी मार्गदर्शन केले. त्यांनी आपल्या मार्गदर्शनातून विद्यार्थीना बचत व गुंतवणुकीचे महत्त्व समजावून सांगितले. श्रीमंत होण्याचे स्वप्न तर प्रत्येक व्यक्तीच बघत असतात परंतु श्रीमंत बनण्यासाठी कोणत्या वर्तणुकी व गुंतवणुकीची आवश्यकता आहे हेही त्यांनी विद्यार्थ्यांना समजावून सांगितले आणि विद्यार्थ्यांना या कार्यक्रमाकरिता शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वाणिज्य विभागाची विद्यार्थिनी कु. सृष्टी शिरसागर हिने केले. तर आभार प्रदर्शन प्रा. अशोक मदनकर यांनी केले. वाणिज्य विभाग व अर्थशास्त्र विभागातील संपूर्ण विद्यार्थ्यांनी कार्यक्रमाचा लाभ घेतला.

अर्थशास्त्र विभागात द्वारे **भारतीय अंदाजपत्रक 2021** या विषयावर पोस्टर प्रदर्शनी दिनांक-




05/02/2021 ला आयोजित करण्यात आली. अंतरीम अंदाजपत्रक 2021 या विषयावर महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी केंद्रीय अंदाजपत्रक 2021 मध्ये Health, Railway, Agriculture, Employment, SMSE, International Trade, Education, उद्योग आयकर, व्यवसायकर, मनरेगा योजना, पीएलआय योजना, दारिद्र्य इत्यादी योजनांची माहिती तसेच विविध क्षेत्रात करण्यात आलेली आर्थिक तरतूद यातून देशाला होणारा फायदा इत्यादींचा भिंती पत्रकाच्या माध्यमातून माहिती साकारली. या प्रदर्शनातून विद्यार्थ्यांना अंदाजपत्रक म्हणजे काय? ते कसे असते? त्याचा आपल्या जीवनावर काय परिणाम होतो, याची माहिती देण्यात आली.




संपूर्ण प्रदर्शनाचे आयोजन बी.कॉम. भाग-1च्या विद्यार्थ्यांनी केले होते. प्रदर्शनाचे उद्घाटन माजी प्राध्यापक व प्रेरणा शिक्षण संस्थेचे सदस्य वरिष्ठ प्रा. श्री. शरद मेंघळ सर यांनी केले. अर्थशास्त्र विभाग प्रमुख प्रा. डॉ. रवी सोरते यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण भिंती पत्र प्रदर्शनीचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महाविद्यालयातील प्रा.डॉ. सुधाकर पवार, प्रा.डॉ. अनिल गणवीर, प्रा. सतीश चंदेल, प्रा. कु. रश्मी गेडाम, प्रा. दिलीप दातीर, प्रा. अशोक मदनकर, प्रा. आशिष आखरे, श्रीमती आशा खडसे, विवेक बालपंडे यांचे सहकार्य लाभले.

